Estd. 1962

'A++' Accredited by NAAC (2021) With CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

३५ /२०२६

**विषय :** विद्यापीठ परिसरामध्ये सभा, मोर्चे, आंदोलने, उपोषण, निदर्शने व तत्सम कार्यक्रम आयोजित करण्याबाबत परवागनी घेणेबाबत.

सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णायानुसार विद्यापीठ परिसरामध्ये शैक्षणिक, संशोधन, परीक्षा व प्रशासकीय कामकाज सुरळीतपणे पार पाडणे तसेच विद्यापीठ परिसरातील शांतता, सुरक्षितता व कायदा-सुव्यवस्था अबाधित राखणे, ही विद्यापीठ प्रशासनाची जबाबदारी आहे. विद्यापीठ परिसरात कोणताही अनुचित प्रकार घडू नये, म्हणून यापूढे विद्यापीठाच्या कोणत्याही परिसरात, इमारतीमध्ये, मैदानावर किंवा विद्यापीठाच्या ताब्यातील जागेमध्ये कोणतीही सभा, आंदोलन, मोर्चा, धरणे, उपोषण, निदर्शने, निषेध नोंदविणे, घोषणाबाजी, निवेदन देणे अथवा तत्सम कार्यक्रम आयोजित करण्यापूर्वी विद्यापीठ प्रशासनाची पूर्वलिखित परवानगी घेणे बंधनकारक राहील.

पूर्वपरवानगीशिवाय अशा प्रकारचे कार्यक्रम आयोजित करणे, त्यामध्ये सहभागी होणे अथवा त्यासाठी आवाहन करणे मान्य राहणार नाही. विद्यापीठाच्या शैक्षणिक, परीक्षा, संशोधन किंवा प्रशासकीय कामकाजात अडथळा निर्माण होईल, असे कोणतेही कृत्य करू नये.

या परिपत्रकातील सूचनांचे उल्लंघन झाल्यास संबंधीतांवर कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल. तरी या परिपत्रकाची नोंद घेऊन त्याचे काटेकोर पालन करावे.

(डॉ. व्ही. एन. शिंदे)
**कुलसचिव**
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**

जावक क्रमांक आस्थापना / 985

दिनांक : 21 JUL 2026

**प्रति,**

१) सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक, शिक्षक, रेक्टर, प्रशासकीय अधिकारी, सेवक, विद्यार्थी व विद्यार्थीनी

२) मा. कुलगुरु, मा. प्र-कुलगुरु, मा. कुलसचिव, मा. अधिष्ठाता, मा. संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळ, मा. वित्त व लेखा अधिकारी यांचे कार्यालय.

३) सर्व संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था यांचे प्राचार्य/ संचालक शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, सेवक.

४) इंटरनेट विभाग - सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.